**१३ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील सर्व पंचायती राज्य संस्था व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण, नियंत्रक व महालेखापरीक्षक (C&AG) यांचे तांत्रिक मार्गदर्शन व पर्यवेक्षणाखाली करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांकः-स्थानिले-१०१० /प्र.क्र.२६-ब /विमा प्रशा
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ३१ मार्च,२०११.

**संदर्भ :-** १३ व्या वित्त आयोगाच्या अहवालातील प्रकरण पृ.क्र. १० परिच्छेद क्र.१०. १२१ व परिच्छेद क्र.१०. १६१ मधील शिफारशी.

**प्रस्तावना**

राज्यातील सर्व पंचायती राज संस्था व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यांचे लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखा विभागामार्फत करण्यात येते. १३ व्या वित्त आयोगाच्या अहवालातील शिफारस क्र.१०.१२१ मध्ये असे सुचित करण्यात आले आहे की, राज्यातील पंचायती राज संस्था व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वित्तीय स्थिती बाबत आयोगास विश्वसनीय माहिती प्राप्त व्हावी व स्थानिक स्वराज्य संस्थांचा अभ्यास करण्यातील अडचणी दूर व्हाव्यात, यासाठी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखे ठेवण्याच्या व लेखापरीक्षणाच्या पध्दतीत नियमितपणा व एकसुत्रीपणा आणण्याच्या दृष्टीने सदर संस्थांच्या लेखे ठेवण्याच्या व लेखापरीक्षणाच्या कार्यपध्दतीत राज्याच्या स्थानिक निधी लेखा विभागाला या पंचायती राज संस्था व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षणाबाबत तांत्रिक मार्गदर्शन व पर्यवेक्षणाची जबाबदारी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचेकडे देण्याची आवश्यकता आहे.

२. १३ व्या वित्त आयोगाच्या वरील शिफारशींच्या अनुषंगाने राज्यातील पंचायती राज संस्था व सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यांचे लेखापरीक्षण, संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, महाराष्ट्र राज्य यांनी नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या तांत्रिक मार्गदर्शन व पर्यवेक्षणाबाबतच्या मार्गदर्शक तत्वानुसार करावयाचे आहे. त्याचप्रमाणे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा वार्षिक तांत्रिक तपासणी अहवाल व संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, महाराष्ट्र राज्य यांचा या संस्थांच्या लेख्यावरील वार्षिक लेखापरीक्षा अहवाल शासनामार्फत राज्य विधान मंडळास प्रतिवर्षी सादर करावयाचा आहे. सद्यःस्थितीत पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा अहवाल शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत राज्य विधीमंडळास सादर करण्यात येतो. परंतु नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत तशी कार्यवाही केली जात नाही.

वरील बाबी संबंधी कार्यवाही करण्याच्या दृष्टीने सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.५, दि.१० मार्च,२०११ रोजी प्रख्यापित करण्यात आला आहे.

१३ व्या वित्त आयोगाच्या शिफारस क्र.१०.१६१ अन्वये प्राप्त होणारे सर्वसाधारण कार्यात्मक अनुदान (General Performance Grant) हे १३ व्या वित्त आयोगाच्या अहवालातील प्रकरण १० मधील शिफारस क्र.१०.१६१ मध्ये विशद करण्यात आलेला कार्यात्मक अनुदानासाठी प्रोत्साहनपर आराखडा (Incentive framework for general performance grant) या सदराखाली नमूद केलेल्या सुधारणा राज्याने दि.३१ मार्च,२०११ पर्यन्त पूर्ण केल्यानंतर मिळणार आहे. तसेच त्याकरीता पंचायती राज संस्था आणि सर्व नागरी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षणाबाबत एकरुप लेखापरीक्षण पध्दती (Uniform Audit System) लागू करणे व सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी तांत्रिक मार्गदर्शन व पर्यवेक्षण भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने शासनाने पुढील निर्णय घेतला आहे-

**शासन निर्णय:-**

०१ राज्यातील सर्व स्तरावरील पंचायती राज संस्थांचे तसेच महानगरपालिकांसह सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची "लेखे ठेवण्याची एकरुप पध्दती " शासनाच्या अनुक्रमे ग्रामविकास व जलसंधारण विभाग व नगर विकास विभाग यांनी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सल्ल्याने विकसित करुन अमलात आणावी.

०२ राज्यातील सर्व पंचायती राज संस्था व महानगरपालिकांसह सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे वार्षिक लेखापरीक्षण करण्यासाठी संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, महाराष्ट्र राज्य हे वैधानिक लेखापरीक्षक म्हणून कार्यरत राहतील व ते वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली काम करतील.

०३ सर्व पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा वार्षिक तांत्रिक तपासणी अहवाल वित्त विभागामार्फत आणि संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, यांचा महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल ग्रामविकास व जलसंधारण विभागामार्फत विधानमंडळास सादर करण्यात येईल. तसेच नगरपालिका/महानगरपालिकांसह सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यांवरील नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा वार्षिक तांत्रिक तपासणी अहवाल वित्त विभागामार्फत आणि संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, महाराष्ट्र राज्य यांच्या नगरपालिका, महानगरपालिकांसह सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल नगर विकास विभागामार्फत विधानमंडळास सादर करण्यात येईल.

०४ राज्यातील पंचायती राज संस्था व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण संचालक,स्थानिक निधी लेखा परीक्षा यांच्याकडून नियमितपणे व एकसुत्रीपणे होण्यासाठी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी तांत्रिक मार्गदर्शन व पर्यवेक्षण करावयाचे आहे. राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षणासंबंधी नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे तांत्रिक मार्गदर्शन व पर्यवेक्षणाबाबतची कार्यपध्दती व कार्यकक्षा पुढील प्रमाणे विहित करण्यात येत आहे.

अ) **लेखापरीक्षण प्रक्रिया व कार्यपध्दती -**

संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, विभागामार्फत करण्यात येणा-या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षणाची प्रक्रिया व कार्यपध्दती ही नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी विहित केलेली मार्गदर्शक तत्वे व मानके तसेच महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा (सुधारणा) अध्यादेश,२०११ मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा नियम, १९३१ मधील तरतुदी व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार असेल.

ब) **लेखापरीक्षा अहवालाचे स्वरुप व व्याप्ती -**

स्थानिक निधी लेखा परीक्षा विभागामार्फत करण्यात येणा-या लेखापरीक्षण अहवालाचे स्वरुप व व्याप्ती त्यातील आशयासह नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी निर्देशित केलेल्या मार्गदर्शक तत्वे व मानके यानुसार असेल.

क) **प्रशिक्षण कार्यक्रम -**

संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचेमार्फत प्रशिक्षण देण्यात येईल. या प्रशिक्षणामध्ये विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आर्थिक व्यवहार, विकासकामांचे स्वरुप विचारात घेऊन लेखापरीक्षण कार्यपध्दती तसेच लेख्यांचे प्रमाणिकरण, लेखापरीक्षण अहवालाचे स्वरुप व व्याप्ती यांचा समावेश असेल.

ड) **लेखापरीक्षण नियोजन -**

संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, हे सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षण कार्यक्रमाचे वार्षिक नियोजन करतील. वार्षिक नियोजनाबाबतची माहिती प्रतिवर्षी माहे डिसेंबर मध्ये भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना सादर करतील. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार आणि सेवेच्या अटी) अधिनियम,१९७१ मधील कलम क्र.१४ (१) अन्वये ज्या संस्थेला केंद्र किंवा राज्य शासनाच्या एकत्रित निधी मधून रुपये २५/- लक्षा पेक्षा कमी नाही एवढे अनुदान किंवा कर्ज देण्यात येते अशा सर्व संस्थांच्या जमा व खर्चाचे लेखापरीक्षण भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना करण्याचे अधिकार आहेत. त्याव्यतिरिक्त ज्या संस्थेला केंद्र व राज्य शासनाच्या एकत्रित निधीतून रुपये २५/- लक्षा पेक्षा कमी अनुदान किंवा कर्ज प्राप्त होते अशा संस्थेच्याबाबत सुध्दा संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा विभागाला तांत्रिक मार्गदर्शन करण्यासाठी संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, महाराष्ट्र राज्य यांनी लेखापरीक्षण केलेल्या घटकांची चाचणी तपासणी नियंत्रक व महालेखापरीक्षक हे करतील.

इ) चाचणी तपासणीच्या घटकांची निवड, घटक संस्था, नियोजन व पथकाची रचना नियंत्रक व महालेखापरीक्षक हे करतील. नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी चाचणी तपासणीसाठी निवड केलेल्या घटकांच्या लेखापरीक्षा अहवालांच्या प्रती संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा हे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना पाठवतील.

ई) संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा यांनी केलेल्या लेखापरीक्षेशिवाय, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना आवश्यक वाटल्यास, लेख्यांची चाचणीदाखल तपासणी करणे आणि संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा यांनी तयार केलेल्या अहवालावर अभिप्राय देण्याचे अधिकार असतील.

फ) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक किंवा लेखापरीक्षणासंबंधी त्यांनी नियुक्त केलेल्या व्यक्तीस वरीलप्रमाणे अधिकार असतील आणि या संदर्भात भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्यानुसार शासकीय लेख्यांचे लेखापरीक्षण करण्याचे विशेषाधिकार आणि प्राधिकार असतील.

ग) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक किंवा त्यांनी नियुक्त केलेला प्रतिनिधी पंचायत राज संस्था/ नागरी स्थानिक स्वराज संस्थांना लेखापरीक्षणाचे निष्कर्ष कळवतील तसेच अहवालाची प्रत थेट शासनास पाठवतील.

ह) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार, सेवेच्या शर्ती) नियम,१९७१ आणि सांविधानिक पध्दतीनुसार लेखे व अभिलेख पहाण्याकरीता नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वरील अटी व शर्तींना कोणत्याही प्रकारे बाधा येणार नाही.

ज) **लेखापरीक्षण पथकाचे नियोजन -**

संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, महाराष्ट्र राज्य हे विभागाची निकड व कर्मचा-यांची उपलब्धता विचारात घेऊन लेखापरीक्षण पथकाचे नियोजन करतील व या पथकाचे पर्यवेक्षण संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा यांचेमार्फत करण्यात येईल. राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचे वार्षिक लेखापरीक्षण वेळेवर व गुणवत्तापूर्वक करण्याची जबाबदारी ही संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा यांची राहील.

क) **नियतकालिक विवरणपत्रे सादर करणे -**

संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, हे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षणात आढळून आलेल्या गंभीर अनियमितता, आर्थिक घोटाळा/अपहार इत्यादी बाबींची माहिती स्वतंत्रपणे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना कळवतील.

ल) **अंतर्गत नियंत्रण -**

नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी निर्धारीत केलेली मानके व मार्गदर्शक तत्वे यांना विचारात घेऊन लेखापरीक्षणाच्या गुणवत्तेत वाढ होण्याच्या'दृष्टीने अंतर्गत नियंत्रणाबाबतची कार्यपध्दती विकसित करण्याची जबाबदारी ही संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा यांची राहील.

म) **स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यांचे प्रमाणिकरण -**

सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यांचे प्रमाणिकरण संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा यांनी करावयाचे असून योग्य प्रमाणिकरणाबाबत नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी पर्यवेक्षण करावयाचे आह

न) **लेखापरीक्षण अहवालाचे अंतिमीकरण व सादरीकरण -**

नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी निश्चित केलेली मार्गदर्शक तत्वे व मानके यांचा अवलंब करुन संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा यांनी लेखापरीक्षण अहवालाचे अंतिमीकरण व सादरीकरण पदनिर्देशित प्राधिका-याकडे करावे.

**०५.** सदर शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.१८१३/सचिव/ग्राम विकास, वित्त-५, दि.७.३.२०११, नगर विकास विभाग अनौ.सं.क्र.५/न.वि-३१ दि.१६.३.२०११ व महालेखापाल, लेखापरीक्षा-१, महाराष्ट्र, मुंबई यांचा अनौपचारिक संदर्भ क्र.No.90-LB/ TGS/74-2010, दि.३० मार्च,२०११ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

**०६.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र.२०११०३३११८००१२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( राजेश अग्रवाल )
सचिव, (ले.व.को.)

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे व उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सहायक,
सर्व विधान मंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य
सर्व संसद सदस्य महाराष्ट्र राज्य
बहुजन समाज पार्टी १, इन्सा हटमेंट,आझाद मैदान,मुंबई-१
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश,सी.डी.ओ.बॅरेक नं.१
योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट,मुंबई
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी,३१४
राजभवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी
जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३
इंडियन नॅशनल कॉंग्रेस,महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय)समिती,
टिळक भवन,काकासाहेब गाडगीळ मार्ग,दादर,मुंबई-२५
नॅशनल कॉंग्रेस पार्टी,राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग,
नरीमन पॉईंट, मुंबई-२१
सर्व मंत्रालयातील विभाग,
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य वित्त व लेखा अधिकारी
मंत्रालयाच्या सर्व विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
प्रशासकीय विभागांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालय प्रमुख
वित्त विभागातील सर्व कार्यासने

महालेखापाल (लेखा परीक्षा)-१ महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल (लेखा परीक्षा)-२ महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२ महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल (वाणिज्यीक लेखापरीक्षा),महाराष्ट्र, मुंबई
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
प्रबंधक, उच्च न्यायालय, (मूळ शाखा,)मुंबई
प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा),मुंबई
प्रबंधक , महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण,मुंबई
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा,कोकण भवन, नवी मुंबई
संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय,मुंबई.
सहमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा परीक्षा. कोकण/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती विभाग.
सह संचालक, ले.व को. पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, कोकण भवन, नवी मुंबई
अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई
सर्व नगरपालिका / महानगरपालिका आयुक्त
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी , सर्व उप कोषागार अधिकारी
सर्व कृषी विद्यापीठ, महाराष्ट्र राज्य
निवड नस्ती, विमा प्रशासन कार्यालय, वित्त विभाग.